# <u>सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, तासगांव, जि. सांगली.</u>

(पीठासिन अधिकरी श्री. एस.वाय.वाकचौरे)

**<u>नियमित दिवाणी दावा क्रमांक २८/२००८</u>**
**<u>निशाणी क्रमांक ३०५ खालील आदेश.</u>**

| | | |
|---|---|---|
| ०१. | श्री. शंकर कदम. | **<u>वादी.</u>** |
| | ***विरुध्द.*** | |
| ०१. | श्री.अजित दगडे वगैरे. | **<u>प्रतिवादी.</u>** |

**(०१).** प्रस्तुत अर्ज हा वादीने दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ नुसार दावा दुरुस्तीसाठी दाखल केलेला आहे.

**(०२).** अर्ज व त्यावरती प्रतिवादींतर्फे दाखल केलेला जबाब यांचे अवलोकन केले. वादी व प्रतिवादी यांच्या वकीलांचा युक्तिवाद ऐकला.

**(०३).** उभय पक्षकारांच्या वतीने करण्यात आलेले कथने विचारात घेता प्रस्तुतचा अर्ज निकाली काढते वेळी खालील मुद्दे माझे विचारात उपस्थित होतात.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १ | वादीचा दावा दुरुस्तीचा अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे काय ? | होकारार्थी. |
| २ | आदेश काय ? | अर्ज मंजूर करण्यात येत आहे. |

## <u>कारणमिमांसा</u>

**<u>मुद्दा क्र.१ करीताः</u>–**

(०४). वादीचे थोडक्यात कथन असे की, वादीने सदरचा दावा निरंतर ताकिदीकरीता व अतिक्रमित जमीनीचा कब्जा मिळण्यासाठी दाखल केला आहे. प्रस्तुत दावा निकालासाठी ठेवलेला असताना, गट क्र. ४२६ चा ७/१२ उतारा दाव्याचे कामी हजर करणे गरजेचे असल्याने वादीने तो काढून पाहिला असता, वादीस सदर मिळकत प्रतिवादी क्र. १ ने विक्री केली असल्याचे समजले. त्यानुसार खरेदी घेणार उमेश विठ्ठल दगडे यांच्या नावाची नोंद ७/१२ उता–यावर झाली आहे. सदर गोष्टीपासून वादी अज्ञात होता. दाव्याची व दावा मिळकतीची झालेली मोजणी याची त्रयस्थ इसम उमेश विठ्ठल दगडे यांना माहिती व जाणीव असताना, त्यांनी सदर मिळकत खरेदी घेतलेली आहे. सदर बाब प्रतिवादी क्र. १ याने न्यायालयास कळविलेली नाही. त्यामुळे त्रयस्थ इसम यांना दाव्यात पक्षकार म्हणून सामील करता आले नाही. दावा अतिक्रमित क्षेत्राचा कब्जा मिळण्यासाठी असल्याने तसेच निरंतर ताकिदीसाठी असल्याने त्रयस्थ इसम खरेदीदार उमेश विठ्ठल दगडे यांना प्रतिवादीपणात सामील करणे गरजेचे आहे. त्यामुळे प्रस्तुत दाव्याच्या सरनाम्यामध्ये प्रतिवादी क्र. २१ असा क्रमांक टाकून उमेश विठ्ठल दगडे, वय–४५ वर्षे, धंदा– शेती, रा. गौरगांव, ता. तासगांव, जि. सांगली अशी दुरुस्ती करणे आवश्यक आहे. तसेच दावा कलम २ नंतर २–अ समाविष्ट करुन त्यामध्ये देखील खरेदी खताच्या अनुषंगाने अर्जात नमुद असल्याप्रमाणे दुरुस्ती करणे आवश्यक आहे. तसेच दावा कलम ७ मधील विनंतीमध्ये ७–अ समाविष्ट करुन प्रतिवादी क्र. १ ते ९ च्या पूढे प्रतिवादी क्र. २० असे लिहून दुरुस्ती करणे आवश्यक आहे. अशा प्रकारे दुरुस्ती केल्याने वादी व प्रतिवादी यांच्यामधील तंटा

मिटण्यास मदत होणार आहे. त्यामुळे प्रतिवादींचे काही नुकसान होणार नाही. दुरुस्ती न झाल्यास वादीचे अपरीमित असे नुकसान होणार आहे. यास्तव त्यांनी सदरचा अर्ज मंजूर करुन दावा दुरुस्त करण्यास परवानगी मिळण्याची विनंती केली आहे.

(०५). सदर अर्जावर प्रतिवादीतर्फे वकीलांनी म्हणणे दाखल करुन असे कथन केले आहे की, अर्ज मान्य नाही, कबूल नाही. प्रतिवादी क्र.१ हे गैरहजर असल्यामुळे त्यांच्याविरुध्द कैफियत नाही असा आदेश पारीत झालेला आहे. प्रतिवादी क्र.१ याने दिनांक २८.०६.२०१३ रोजी जमीनीची विक्री केली आहे. त्यानंतर १२ वर्षापेक्षा जास्त काळ वादीने कोणतीही तजवीज केलेली नाही. अर्ज मुदतीत नाही. वादीच्या अर्जावरुन इतर प्रतिवादींचा तथाकथीत अतिक्रमणाशी काहीही संबंध नाही असे दिसुन येते. दावा निकालावर आहे. यापुर्वीचा दावा व त्यावरील अपील यांचे सर्व कागदपत्रे अभिलेखावर आहेत. यास्तव त्यांनी सदरचा अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

(०६). अभिलेखाचे काळजीपूर्वक अवलोकन केले असता असे दिसुन येते की, वादीने प्रस्तुतचा दावा अतिक्रमित क्षेत्र काढून मिळण्यासाठी व निरंतर ताकिदीसाठी दाखल केलेला आहे. प्रस्तुत दावा आज रोजी न्यायनिर्णयासाठी नेमलेला असताना, वादीने प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे. वादीचे असे कथन आहे की, गट क्र.४२६ ही मिळकत प्रतिवादी क्र. १ ने उमेश विठ्ठल दगडे यांना विक्री केलेली आहे. त्या अनुषंगाने दाव्याच्या सरनाम्यामध्ये, विनंती कलमामध्ये व

दाव्याच्या कथनामध्ये दुरुस्ती करणे आवश्यक आहे. प्रतिवादींनी मात्र प्रस्तुत दावा निकालासाठी नेमलेला असुन सदर अर्ज मुदतीत नाही म्हणून तो नामंजूर करावा असे कथन केले आहे. त्या अनुषंगाने दिवाणी प्रक्रिया संहिताचा आदेश–६, नियम–१७ ची तरतुद पाहिली असता, त्यामध्ये असे नमुद केले आहे की, "न्यायालयास कार्यवाहीच्या कोणत्याही टप्प्यावर दोन्ही पक्षकांरापैकी कोणत्याही पक्षकारास त्याच्या वाद कथनास न्याय असेल अशा रीतीने व अशा अटीवर फेरबदल करण्याची किंवा सुधारणा करण्याची मुभा देण्यात येईल आणि पक्षकारामध्ये वादग्रस्त असलेला प्रश्न निर्णीत करण्यासाठी आवश्यक असतील अशा सर्व सुधारणा केल्या पाहिजेत." सदर तरतुदीमध्ये पूढे असे नमुद केले गेले आहे की, "न्यायचौकशी सुरु झाल्यानंतर, पक्षकारांनी योग्य ती खबरदारी घेवुनसुध्दा न्यायचौकशी सुरु होण्यापूर्वी त्याला ती बाब पूढे आणता आली नाही याबाबत न्यायालयाचे समाधान असल्याखेरीज सुधारणेसाठीचा अर्ज अनुज्ञेय राहणार नाही."

(०७). वादीने सदर अर्जासोबत दाखल केलेला फेरफार क्र. २३७७ पाहिला असता, त्यावरुन गट क्र. ४२६ चे खरेदीखत दिनांक २८.०६.२०१३ रोजी झाल्याचे दिसते. त्या अनुषंगाने प्रस्तुत दाव्याचे अवलोकन केले असता, सदरचा दावा हा दिनांक १३.०२.२००९ रोजी चौकशीला लागलेला असल्याचे दिसते. यावरुन झालेले खरेदीखत हे दावा चौकशीला लागण्यापुर्वी झालेले नाही ही बाब स्पष्ट होते. दिवाणी प्रक्रिया संहितामधील तरतुदीनुसार न्यायालय कोणत्याही टप्प्यावर आवश्यक असलेली दुरुस्ती करण्यास परवानगी देवु शकते. प्रस्तुतचा निकालासाठी नेमलेला आहे. परंतू, दाव्याचे स्वरुप पाहिले असता, गट क्र. ४२६

चे खरेदीदार हे दाव्यामध्ये आवश्यक पक्षकार असल्याचे दिसुन येते. मोजणी नकाशामध्ये गट क्र. ४२६ च्या धारकाकडे दावा मिळकतीपैकी काही क्षेत्र असल्याचे नमुद आहे. यास्तव गट क्र. ४२६ चे खरेदीदार यांना दाव्यामध्ये समाविष्ट करुन नैसर्गिक न्यायतत्वानुसार त्यांची बाजू दाव्यामध्ये न्यायनिर्णय पारीत करण्यापुर्वी ऐकणे आवश्यक ठरते. वादीने अर्जात नमुद केल्याप्रमाणे दुरुस्ती केल्यास प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. उलट दाव्याचा न्यायनिर्णय गुणदोषावर होण्याकरीता मदत होणार आहे. अर्जात नमुद असल्याप्रमाणे दुरुस्ती केल्याने दाव्याच्या मुळ स्वरुपात कोणताही बदल होणार नाही. यास्तव दाव्यामधील भविष्यातील वांरवारीता टाळण्याकरीता तसेच वादी व प्रतिवादी यांचेतील वादप्रश्न गुणदोषावर निकाली काढण्याकरीता गट क्र. ४२६ चे खरेदीदार यांना दाव्यात समाविष्ट करणे आवश्यक ठरते. यास्तव वादीचा अर्ज मंजूर होण्यास पात्र ठरतो.

(०८). फेरफार क्र. २३७७ अन्वये गट क्र. ४२६ चे खरेदीखत हे दिनांक २८.०६.२०1३ रोजी झालेले आहे असे दिसते. वादीच्या म्हणण्याप्रमाणे गट क्र. ४२६ ही त्यांच्यामिळकतीच्या लगत आहे. जर गट क्र. ४२६ बाबत खरेदीखत झालेले असेल तर त्याची माहिती १२ वर्षे वादीला नाही हे पटण्याजोगे नाही. यावरुन वादीचा निष्काळजीपणा दिसुन येतो. प्रस्तुतचा दावा सन २००८ मध्ये दाखल असुन त्याचा कालावधी १५ वर्षापेक्षा जास्त झालेला आहे. वादीच्या निष्काळजीपणामुळे प्रस्तुत दावा आणखी लांबणीवर पडणार आहे. परंतू, दाव्याचे स्वरुप पाहता वर दाव्यातील वारंवारीता अगर गुंतागुंत टाळण्याकरीता तसेच वादी व प्रतिवादी यांच्यातील वादप्रश्न नैसर्गिक न्यायतत्वाच्या आधारे निकाली

काढण्याकरीता प्रस्तुत अर्ज मंजूर करुन वादीस दुरुस्तीची परवानगी देणे आवश्यक ठरते. वादीच्या कृत्यामुळे दाव्यामध्ये झालेला उशीर पाहता वादीविरुध्द खर्चाचा आदेश पारीत करणे उचित होणार आहे. सबब, मी मुद्दा क्र.१ चे उत्तर होकारार्थी नोंदवित आहे.

**मुद्दा क्र.२ करीताः–**

**(०९).** मुद्दा क्र.१ चे उत्तरादाखल वादी हे विनंतीनुसार दावा दुरुस्ती करण्यासाठी पात्र ठरलेले आहेत. प्रस्तुत प्रकरणामध्ये प्रतिवादी क्र. २, ५ व ७ हे व त्यांचे वकील हजर असुन इतर सर्व प्रतिवादी व त्यांचे वकील गैरहजर आहेत. यास्तव सदरची खर्चाची रक्कम ही प्रतिवादी क्र. २,५ व ७ यांना देणे उचित होणार आहे. यास्तव मी मुद्दा क्र.२ चे उत्तरादाखल पुढीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आ दे श

**०१.** प्रस्तुतचा अर्ज रक्कम रुपये ३०००/– इतक्या खर्चासह मंजूर करण्यात येत आहे. खर्चाची रक्कम आज अगर पुढील तारखेपर्यंत वादीने प्रतिवादी क्र. २,५ व ७ यांना दयायची आहे.

**०२.** वादीने खर्चाची रक्कम भरल्यानंतर मुदतीत मुळ दाव्यामध्ये दुरुस्ती करुन दुरुस्त दाव्याची प्रत अभिलेखावर दाखल करावी.

SATISH YASHWANT WAKCHAURE
Digitally signed by SATISH YASHWANT WAKCHAURE
Date: 2026.03.16 17:27:04 +0530

**तासगांव**.
दिनांक : १६.०३.२०२६.

(एस.वाय.वाकचौरे)
सहदिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,
**तासगांव**.

मी हमी देतो की, सदरच्या पी.डी.एफ. फाईल मधील सर्व मजकूर हा मुळ आदेशातील प्रत्येक शब्दानुसार बरोबर आहे.

लघुलेखकाचे नाव – श्री. अभय अरविंद रणदिवे

न्यायालय – सहदिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, तासगांव, जिल्हा सांगली.

दिनांक – १६.०३. २०२६.

न्यायीक अधिकारी यांनी
सही केलेली दिनांक – १६.०३. २०२६.

आदेश अपलोड दिनांक– १६.०३. २०२६.